## नियमीत दिवाणी दावा क्र.५०/२०१८ मधील निशाणी क्र.६६, ६७ आणि ६८ खालील एकत्रीत आदेश

## विठ्ठल महाले वि. सुलोचना व इतर

वादीने अर्ज निशाणी क्र.६८ हा प्रकरणातील मयत वादी यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरीता दाखल केला आहे. तसेच अर्ज निशाणी क्र.६६ व ६७ हे विहित मुदतीत वादीचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यासाठी व अबेटमेंटचे आदेश रद्दबातल होण्याकरीता वादीने दाखल केले आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे हा दावा प्रलंबित असताना वादी यांचे निधन १३/०२/२०२५ रोजी झाले. नियमाप्रमाणे वादीचे वारस हे ९० दिवसाच्या आत रेकॉर्डवर आणणे आवश्यक आहे. परंतू सदरचा कालावधी हा संपूण गेला आहे तसेच वारस रेकॉर्डवर आणण्यास उशीर झाला आहे. त्यामुळेच वादीने हे  अर्ज सादर केले आहेत.

२. याउलट प्रतिवादींच्या कथनाप्रमाणे वादीचे अर्जातील कथन अमान्य केले आहे. अर्जामध्ये पुरेसे व समाधानकारक कारण दिले नाही. तसेच अर्जास विलंब का झाला याचे योग्य स्पष्टीकरणही वादींनी दिले नाही. वादी हे जाणीवपुर्वक प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करीत आहेत. करीता प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली.

३. अभिलेखाची पडताळणी केले असता असे दिसून येते की, सदरचे प्रकरण हे मुळ वादी यांनी प्रतिवादी क्र.७ यांनी पारीत केलेले आदेश रद्दबातल होवून मिळावे तसेच दि.२४/११/१९८१, ११/०४/१९८४, १६/०४/१९९२, २५/०८/१९९३, २४/०८/१९८१ व ०२/०५/२००८ हे खेरदीपत्र गैरकायदेशीर आहे व ते रद्दबातल आहेत असे जाहिर होवून मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रकरण प्रलंबित असताना मुळ वादी हे मयत झाले. त्यानंतर कायद्याने विहित केलेल्या मुदतीत म्हणजे ९० दिवसात प्रस्तुतच्या अर्जदाराने हा अर्ज सादर केला नाही. त्यामुळे त्यांना अर्ज सादर करण्यास विलंब झाला आहे. परंतु विलंबाचे

सादर करण्यात आलेले स्पष्टीकरण पाहता सदरचे स्पष्टीकरण स्वीकारता येण्याजोगे असल्याचे दिसून येते. निश्चीतपणे मुळ वादीच्या वकीलांना प्रस्तुत अर्जदारांना त्यांचे वारस या नात्याने दावा पुढे चालविण्याचे अधिकार आहेत. त्यामुळेच हा अर्ज मंजूर करुन अर्जदारांना रेकॉर्डवर न घेतल्यास अर्जदारांचे भरुन न निघणारे नुकसान होईल या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. त्यामुळेच झालेला विलंब माफ करणे योग्य ठरेल तसेच अर्जदारांना मयत वादीचे वारस म्हणून प्रकरणात समाविष्ट करणे देखील योग्य ठरेल या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज निशाणी क्र.६६, ६७ व ६८ मंजूर करण्यात येत आहेत.

२. मयत वादीचे वारसदार म्हणजेच प्रस्तुत अर्जदार यांना वादी म्हणून दाव्यात समाविष्ट करण्यात येत आहे.

३. अर्जदारांनी त्या अनुषंगानी वादपत्रात दुरुस्ती करावे व दुरुस्तीप्रत अभिलेखावर दाखल करावे व एक प्रत प्रतिवादींना द्यावे असे निर्देश अर्जदारांना देण्यात येते.

SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE

Digitally signed by SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Date: 2025.11.26 14:47:28 +0530

( एस. एस. सहस्त्रबुद्धे )

दिनांक – २४/११/२०२५. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाशिम.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word to word, as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- S. V. Dere (Stenographer G-III) |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Washim. |
| 3) | Date | :- 24/11/2025 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 24/11/2025 |
| 5) | Order uploaded on | :- 26/11/2025 |